MHGA130001932023

सत्र खटला क्र.८२/२०२३
(जुना क्र. ३८/२०२१)
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
भामरागड–वि– बाजु मटटामी+१

निशानी १७ वरील आदेश
(दि.२३/०४/२०२४)

१. अर्जदार/आरोपी क्र.१ बाजु नवलू मटट्‌ामी याने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे भामरागड पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २५/२०२० मध्ये भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९ व १२०(बी), सह कलम ५/२७, ७/२७, ५/२८, ३/२५ भारतीय हत्यार कायदा, कलम १६, १८, २० व २३ बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक अधिनियम (युएपी ॲक्ट) अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार राह. तुमरकोडी ता. भामरागड जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, तो शेती व मजुरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. त्याचा या प्रकरणाशी तिळमात्र संबंध नाही. त्याला संशयाच्या आधारावर गुंतविण्यात आले आहे. तो कुटुंबातील एकमेव कमविता व्यक्ती असून त्याची जामीनावर सुटका न झाल्यास त्याचे कुटुंबावर उपासमारीची पाळी येईल. त्याला जामीन मिळाल्यास तो कुठेही पळून जाणार नाही व तपासी कामात सहकार्य करण्यास तयार आहे. तो न्यायालयाच्या शर्ती व अटींचे पालन करण्यास तयार आहे. करीता अर्जदारास जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

३. सरकारी वकिल श्री कुंभारे यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे सदर अर्जाचे पाठीमागे दिले की, त्यांनी सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. अर्जदार हा नक्षल सदस्य आहे. कलम १६४ फौ प्र सं. ते अन्वये घेतलेल्या महेश हनुमंतू आत्राम यांच्या बयानात

सदर अर्जदाराचा नक्षल गतिवीधीमध्ये सहभाग असल्याचा उल्लेख आहे. सदर घटनेमध्ये पोलिस कर्मचा–यांचा मृत्यू झाला आहे. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. सदरचा मामला न्यायप्रविष्ट असून आरोपीला जामीन मिळाल्यास तो पुन्हा नक्षल दलममध्ये सक्रिय होवून फरार होण्याची व गोपनिय माहिती नक्षलवादयांना देण्याची तसेच साक्षीदार यांचे जिवीतास धोका पोहचवण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता वरील कारणांमुळे आरोपीचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादी रघुनाथ शिंदे पोलीस उपनिरीक्षक पोलीस मदत केंद्र कोठी, ता.भामरागड जि.गडचिरोली यांनी फिर्याद दिली की, दि. १४.०८. २०२० रोजी सकाळी ८.०० वा. पो.स्टे.तील अधिकारी कर्मचारी यांची पोलीस उपनिरीक्षक योगेश बोधगिरे यांनी गिनती घेतली. त्यानंतर पो.स्टे.मधील तैनात असलेले कर्मचारी पोशि. दुशांत पंढरी नंदेश्वर आणि पोशि. दिनेश भारतराव भोसले हे दोघे ०८. ४५ वा. सुमारास बाजार करण्यासाठी कोठी गावात मोटारसायकलने रवाना झाले. त्यानंतर ०९.०० वा.सुमारास त्याला गावामध्ये फायरिंग झाल्याचा आवाज आला. त्याचवेळी पो.स्टे. मधील मोर्चा क्र.०२ येथील संट्रीने स्टॅंड टु कॉल वाजविला. लागलीच ते तसेच पो.स्टे.तील सर्व जिल्हा पोलीस, एसआरपिएफ तसेच सीआरपीएफ चे अधिकारी व कर्मचारी या सर्वांनी स्टॅंड टु ची पोजिशन घेतली. त्यानंतर ते मोर्चा क्र. ०२ येथे जावून संट्रीला स्टॅंड टु कॉल का वाजविला असे विचारणा केली असता नमुद मोर्चातील संट्रीने समोर फायरिंगचा आवाज आल्याने स्टॅंड टु वाजविला असल्याचे सांगितले.

५. त्यानंतर काही वेळाने दिनेश भोसले हा जखमी अवस्थेत मोर्चा क्र.०२ चे भिंतीजवळ आला. त्यानंतर त्यास शिडीचे साहयाने भिंतीवरून पो.स्टे. च्या आतमध्ये घेतले. तेव्हा त्यांनी त्याच्या हाताला जखम झालेली व त्यातुन रक्त वाहत असल्याने पाहिले. त्यांनी त्यास काय झाले असे विचारले असता त्याने सांगितले की, ‘‘तो आणि दुशांत असे दोघे मोटारसायकलने कोठी गावात बाजार करण्यासाठी गेलो असता गावात दोन अनोळखी इसम रेनकोट घालून उभे असलेले दिसले. त्याला संशय आल्याने त्याने दुशांतला तसे सांगितले व त्यानंतर त्या दोघांची विचारपुस करण्यासाठी ते दोघेही त्यांचेजवळ गेले. त्यावेळी तेथे इतर दोघेजन देखील होते व ते चौघेजण आपसात बातचित करत होते. त्यावेळी त्यांनी

सदर रेनकोट घातलेल्या इसमांना तुम्ही कोठून आला आहात असे विचारले असता त्यांनी त्यांना ते तोयणार गावचे असल्याचे सांगितले. तसेच त्यांना कशासाठी आले आहात असे विचारले असता ते किराणा सामान आणण्यासाठी आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांच्या हातात सामान घेण्यासाठी कोणतीही पिशवी न दिसल्याने त्यांचा त्याला अधिक संशय आल्याने त्यांना पोमकें कोठी येथे अधिक चौकशीसाठी चला असे म्हणाला आणि त्यांना चालत पुढे व्हा आम्ही दोघे येतो असे म्हटले.

६. त्यानंतर ते गावामध्ये लावलेल्या त्यांच्या मोटारसायकलजवळ गेले आणि तोपर्यंत ते दोघे इसम थोडे अंतर पुढे गेले होते. त्यांनी मोटारसायकल चालू करून त्यांचे दिशेने निघाले असता त्या दोघांनी त्यांचेकडील हत्यारामधून त्यांचेवर गोळीबार केला. त्यामुळे ते मोटारसायकलवरून खाली पडले. मोटारसायकलवर पुढे बसलेला दुशांत यास गोळया लागल्याने तो जखमी झाला. तसेच दिनेश भोसलेच्याही उजव्या हाताचे मनगटाला गोळी लागल्याने तो ही जखमी झाला. दुशांत हा जखमी होवून जमीनीवर पडल्याने तसेच त्यांचेवर फायरिंग करणारे दोन नक्षलवादयां व्यतिरिक्त त्यांचे इतरही साथीदार असण्याची शक्यता असल्याने त्यांना मदत मिळण्याकरीता तो पो.म.कें. कोठीचे मागचे बाजुने धावत धावत आला आहे असे सांगितले. असे सांगितल्यानंतर फिर्यादी यांनी पो.स्टे.तील जिल्हा पोलीस तसेच सिआरपीएफ जवानांची पोलीस पार्टी तयार करून घटनास्थळी गेले असता तेथे दुशांत पंढरी नंदेश्वर यास गोळया लागल्याने तो निपचीत मृत अवस्थेत जमीनीवर पडलेला दिसून आला. त्यास त्यांनी उचलून पोमके कोठी येथे घेवून आले. त्यास छातीवर व मानेवर जखमांच्या खुना होत्या. त्यानंतर मृत दुशांत नंदेश्वर यास व जखमी दिनेश भोसले यांना अधिक उपचाराकरीता गडचिरोली येथे वाहनाने रवाना केले.

७. त्यानंतर त्यांना त्यांचे गोपनिय बातमीदारांमार्फत कळाले की, सदरचे दोन नक्षल हे कंपनी १० च्या ॲक्शन टिमचे सदस्य होते. तसेच नक्षलवादयांचा डेरा तोयणार व तुमरकोठी गावाचे मध्ये जंगलामध्ये असल्याचे समजले आहे आणि सदर डे–यामध्ये दिनेश, रमेश, रूपेश व भामरागड दलमचे व गटटा दलमचे तसेच कंपनी १० चे नक्षलवादी थांबले असल्याचे समजले. या नक्षलवादयांनी दुशांत पंढरी नंदेश्वर व दिनेश भारतराव भोसले या दोघांना मोटारसायकलवर असतांना त्यांच्याकडील हत्यारातून गोळीबार करून दुशांत पंढरी

नंदेश्वर यास ठार केले व दिनेश भारतराव भोसले यांस जखमी केले. त्यामुळे फिर्यादी यांनी नक्षलवादयांनी संगनमत करून, कट रचुन पोलीस जवानांवर त्यांच्याकडील बेकायदेशीर अग्निशस्त्रातून जिवे ठार मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार करून दुशांत नंदेश्वर यास ठार केले व दिनेश भोसले यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने त्यांचेविरूध्द कार्यवाही होण्याकरीता फिर्याद दिली. अशा फिर्यादीच्या फिर्यादवरून भामरागड पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २५/२०२० मध्ये भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९ व १२०(बी), सह कलम ५/२७, ७/२७, ५/२८, ३/२५ भारतीय हत्यार कायदा, कलम १६, १८, २० व २३ बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक अधिनियम (युएपी ॲक्ट) अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

८. अर्जदार/आरोपीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, आरोपी बाजु व आरोपी किशोर यांना एकाच दिवशी अटक करण्यात आली आणि या न्यायालयाने आरोपी किशोरला नि० १२ वर पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे दि १२.२.२०२४ रोजी सुटका केलेली आहे. अर्जदार याचा सुध्दा सहभाग आरोपी किशोरप्रमाणे असल्याचे अभियोग पक्षाचे आरोपी आहे. त्यामुळे समान न्याय तत्वाच्या आधारे आरोपीला जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

पुढे असे सुध्दा युक्तीवादात नमुद केले आहे की, अभियोग पक्षाप्रमाणे साक्षदार महेश आत्राम हा प्रत्यक्षदर्शी घटनेचा साक्षदार आहे तर घटना दि. १४.८.२०२० रोजी घडली असतांना त्याचे बयान दि ८.१०.२०२० रोजी नोंदविण्यात आले. त्यावरुन साक्षदाराची साक्ष उशीरा नोंदविल्याने त्याचे साक्षेवर प्रश्न चिन्ह निर्माण होतो. इतकेच नव्हेतर सदर गुन्हयाचा तपास पुर्ण होवून दोषरोपपत्र दि. २३.०५.२०२१ रोजी दाखल करण्यात आले. परंतु आजपावेतो या प्रकरणात अभियोग पक्षाने कोणतीही प्रगती केलेली नाही. दोषारोप सुध्दा नोंदविण्यात आले नाही. अर्जदार हा कोणताही दोष नसतांना सन २०२१ पासून गजाआड आहे. त्यातील साक्षदार व फिर्यादी हे पोलीस कर्मचारी असल्याने त्यांचेवर दबाव आणण्याची शक्यता नाही. अर्जदार हा नियमित न्यायालयात व पोलीस स्टेशनला हजेरी देण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदारास जाचक शर्ती व अटींच्या अधिन राहुन जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

९. याउलट सरकारी वकिल श्री कुभांरे यांनी असा युक्तीवाद मांडला की, साक्षदार महेश आत्राम याचे कलम १६४ व कलम १६१ फौजदारी प्रक्रीया संहितेचे बयान एक सारखे असून त्याने आरोपी किशोर व बाजू यांचे बाबत प्रत्यक्ष घटना कशी घ ाउली याबाबत सांगितलेले आहे. अशा परिस्थीतीत महेश प्रत्यक्षदर्शी साक्षदार असल्याने आरोपीला जामीन दिल्यास महेश याच्या जिवीतास धोका निर्माण होउ शकतो. गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

१०. साक्षदार महेश आत्राम याचे बयान दि ८.१०.२०२० रोजी नमुद करण्यात आले आहे. परंतु घटना ही १४.८.२०२० ची असल्याने प्रत्यक्षदर्शी साक्षदाराचे बयान उशीरा का नोंदविले याबाबत आरोपीच्या वतीने जो प्रश्न चिन्ह निर्माण केला आहे त्यात तथ्य दिसून येते कारण या साक्षदाराचे बयान आरोपीला दि ३.१०.२०२० रोजी अटक केल्यानंतर नोंदविण्यात आले आहे. अशा परिस्थीतीत महेश हा खरोखर प्रत्यक्षदर्शी घटनेचे साक्षदार आहे असे म्हणता येणार नाही. असा जो युक्तीवाद आरोपीच्या वतीने मांडण्यात आला तो या गुन्ह्याचा तपास करणारा तपासी अधिकारी याचे साक्षेच्या नंतर ठरवीता येईल. त्यामुळे या घडीला अर्जदाराला गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. कारण अर्जदार यास आरोपी किशोरला जामीन मंजूर केली त्याप्रमाणे अर्थात समान न्याय तत्वाप्रमाणे अर्जदाराला जामीन मागण्याचा हक्क व अधिकार आहे.

११. आरोपीला दि.०३.१०.२०२० रोजी अटक करण्यात आली आहे आणि तेव्हापासून आरोपी हा गजाआड आहे. या गुन्हयाचा तपास पुर्ण होवून दि.२३.०५.२०२१ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. गुन्हा गंभीर स्वरूपाचा असतांना सुध्दा दि.२३. ०५.२०२१ पासून अभियोग पक्षाने कोणतीही प्रगती केलेली नाही. उलट असे म्हणता येईल की, निशानी ७ प्रमाणे दि.०९.०८.२०२१ रोजी ड्राप्ट चार्ज देण्यात आले. परंतु त्यावर कोणतीही सुनावणी न होता दुसरा ड्राप्ट चार्ज निशानी १४ दि.२६.०६.२०२३ रोजी देण्यात आलेला आहे. अर्जदार हा जरी नक्षल आहे असा अभियोग पक्षाचा आरोप असला तरी तो आरोप अजून सिध्द झालेला नाही. इतकेच नव्हे तर जदल गतीने न्याय मिळावा हा प्रत्येक आरोपीचा भारतीय संविधानाने दिलेला हक्क व अधिकार आहे. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाने या प्रकरणात प्रगती करणे गरजेचे होते, परंतु तसे प्रयत्न करण्यात आल्याचे

दिसून येत नाही.

१२. आरोपीविरूध्द लावण्यात आलेले आरोप खरे आहे अथवा नाही हे पुराव्याअंती तपासले जाईल, परंतु या प्रकरणात अभियोग पक्षाने कोणतीही प्रगती केलेली नाही. अशा परिस्थितीत अर्जदाराला विनाकारण गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे शर्ती व अटींच्या आधारे अर्जदारास जामीन मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. जामीन अर्ज निशानी १७ मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार/आरोपी क्र.१ बाजु नवलू मटट्रामी यांस रक्कम रु.५०,०००/— च्या जात मुचलक्याची (P.R. Bond) व तेवढयाच रकमेचा एक जामीन (Surety) देण्यात यावा.

३. अर्जदाराने गुन्हयाची पुनरावृत्ती करु नये. तसेच फिर्यादी व साक्षदार यांच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संपर्क साधु नये तसेच त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणू नये.

४. अर्जदाराने फिर्यादीची साक्ष नोंदवेपर्यंत भामरागड पोलीस स्टेशनला दर महिन्याच्या पहिल्या रविवारी दुपारी ०१.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजेरी द्यावी. तसेच न्यायालयात न चुकता पेशी तारखेवर हजर राहावे.

स्वा/—

अहेरी.
दि. २३/०४/२०२४

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.